केवळ एका अंशाइतके आहे. अधिकांश सृष्टी अप्राकृत व्योमात आहे. ज्याला ह्या प्राकृत सृष्टीतून त्या अप्राकृत सृष्टीत भगवद् धामात जाण्याची इच्छा असते अशा भक्ताला भगवंताच्या त्या ब्रह्म ज्योतीत तात्काळ नेले जाते. अशा रीतीने जीवाचा त्या अप्राकृत व्योमात प्रवेश होतो.

## गुण, कर्मानुसार व्यवस्था

या प्राकृत जगात देहाचे रक्षण करण्याकरता मनुष्याला कर्म करावेच लागते. गुण व कर्मानुसार समाजाचे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र अशा चार वर्णात विभाजन केलेले आहे. प्रत्येकाच्या कर्माचीही विभागणी करणेत आलेली आहे. आणि ह्यातील प्रत्येक वर्ग आपापले कर्म करुन धर्म व्यवस्थेचे पालन करीत असतो. ते त्याला करावेच लागते. मानव समाजात मनुष्य शुद्र असो, व्यापारी असो, योद्धा असो, प्रशासक असो किंवा राजकारणी असो अथवा शेतकरी असो, किंवा तो सर्वोच्च वर्गातला असला किंवा साहित्यिक, वैज्ञानिक अथवा अध्यात्मवादी जरी असला तरी सुद्धा सर्वांना आपली जीवन धारणा करण्याकरिता कर्म हे करावेच लागते. मात्र हे कर्म करीत असताना जर आपण सतत नामस्मरणाच्या साखळीद्वारे, त्याचे सतत चिंतन करीत राहिलो, त्याच्याशी अनुसंधान राखून असलो तर मुक्तीचा सोपान आपल्या हाती निश्चितच लागल्या शिवाय राहणार नाही.

संसारी माणसाने आपली सांसारिक कर्मेही फार चांगल्या रीतीने पार पाडावी परंतु ही कर्मे पार पाडत असताना सतत भगवान श्रीकृष्णाचे स्मरण ठेवावे त्याच्याशी अनुसंधान राखून असावे. इथे फक्त अनुरागाची अपेक्षा आहे. भगवंताबद्दलचा आपला प्रेमभाव विकसित करण्याची जरूरी आहे. आपण नीट विचार केला तर आपल्या लक्षांत येईल की वस्तुत: आपण आपल्या देहाने कर्मे करीत नाही तर ती मनापासून करीत असतो. म्हणजे चित्तद्वारा आणि बुद्धीद्वारा आपण आपली कर्मे करीत असतो. म्हणून जर बुद्धी आणि मन भगवंताच्या चिंतनात नित्य तल्लीन झालेले असतील तर स्वाभाविकपणे इंद्रिये सुद्धा आपोआपच त्या भक्तीत तल्लीन होतील. म्हणजे बाह्यत: इंद्रियांची कर्मे तीच राहतात परंतु चेतनेत बदल होतो. मन आणि बुद्धी यांना भगवंताच्या चिंतनात कसे तल्लीन करावे हे भगवद्गीता मानवाला शिकविते. अशा तल्लीनतेने किंवा मन्मयतेने मनुष्य भगवद्धामात प्रवेश करण्यास समर्थ होतो. भगवान श्रीकृष्णाच्या चिंतनात पूर्णपणे तल्लीन असणे ही एक दिव्य कला आहे. मन आणि बुद्धी यांना भगवंताच्या चिंतनात कसे तल्लीन करावे हे भगवद्गीता मानवाला शिकवते. अशा तल्लीनतेने किंवा तन्मयतेने मनुष्य भगवद्धामात प्रवेश करण्यास समर्थ होतो. भगवान श्रीकृष्णाच्या चिंतनात पूर्णपणे तल्लीन असणे ही एक दिव्य कला आहे. आणि हे भगवद्गीतेचे रहस्यही आहे.

अशा तऱ्हेने भगवंताशी तदाकार होण्याच्या ह्या योगक्रियेला भक्तियोग असे म्हणतात. संत तुकाराम, नामदेव, जनाबाई, संतसखू अशी अनेक संताची, विभूतीची अर्वाचिन काळात आपल्याला ओखळ झाली आहे. ही सारी भक्तीयोगवादी मंडळी आहेत. त्यांनी आपल्या आपल्या संसारातच हरघडी भगवंत पाहिला आणि भगवंताला आपलासा केला. गोवऱ्या थापटता थापटता मुखाने विठ्ठल विठ्ठल म्हणणाऱ्या जनीची निर्जीव गोवरी सुद्धा विठ्ठल विठ्ठल बोलू लागली होती. एवढे एकच उदाहरण इथ पुरेस आहे. हा पवित्र धर्मग्रंथ आहे. इतकाच नव्हे तर तो जीवनार्थ समजावून देणारा निखळ तत्वज्ञानाचा अमृतकुंभ म्हणून एकदा तरी आयुष्यात भगवदगीता वाचून पहा. तुमच्या वृत्तीत निश्चितच बदल घडेल.

■ ■ ■

संत ज्ञानदेवांचा, आळंदी - पंढरपूर

# पालखी सोहळा : एक जनजागरण मोहीम

विद्याधर ताठे
(कार्यकारी संपादक श्री साईलीला)



*श्रीक्षेत्र पंढरपूरच्या आषाढी महायात्रेसाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून साधूसंतांच्या अनेक पालख्या नामघोषाच्या गजरात पंढरीस पायी येतात. या पालख्यांमध्ये आळंदीहून निघणारा संत ज्ञानदेवांचा व देहूहून निघणारा संत तुकारामांचा हे दोन प्रमुख पालखी सोहळे होत. न निमंत्रण देता, स्वखर्चाने, स्वयंस्फूर्तपणे अनंत भौतिक हालअपेष्टा सहन करीत या पालखी सोहळ्यासाठी हजारोंच्या संख्येने जमणारा 'वारकरी समाज' हा संतांनी केलेला चालता-बोलता चमत्कार आहे. पंढरीकडे जातायेता वाटेतील गावांवर भक्तीप्रेमाचे-प्रेमबोधाचे अमृतसिंचन करणारे हे पालखी सोहळे लोकजागृतीचे लोकविलक्षण साधन ठरले आहेत.*

श्री क्षेत्र पंढरपूरची आषाढी महायात्रा व या यात्रेसाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून येणारे विविध साधूसंतांचे पालखी सोहळे म्हणजे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक संचिताचे दर्शन आहे. अन्य गोष्टींचे दर्शन हा केवळ डोळ्याचाचा विषय आहे पण पालखी सोहळ्याचे दर्शन हा डोळ्याबरोबरच काना मनाचा व आत्म्याचा विषय आहे. कारण हे सोहळे म्हणजे ज्ञानोबा-तुकोबांच्या संतसंगतीत परमात्म्याच्या भेटीसाठी आसुसलेल्या आत्म्याचीच एक महायात्रा आहे!

ज्येष्ठ महिना उगवतो आणि वारकरी मनाला पंढरीरायाचा, आषाढीयात्रेचा, आळंदी-देहूच्या प्रस्थानसोहळ्याचा वेध लागतो.

**भेटीलागे जीवा लागलीसे आस।**
**पाहे रात्रंदिवस वाट तुझी।।**

असा पंढरीयात्रेचा टकळा त्याला लागतो. वावरातली (शेतातली); घरातली सारी कामे मार्गी लावून- अडीअडचणींची कोणतीही सबब न सांगता तो जेष्ठ वद्यात आळंदी-देहूच्या प्रस्थान सोहळ्यास येतो. 'प्रस्थान' हाही एक देवदुर्लभ सोहळाच असतो. देहूच्या मंदिरातून संत तुकारामाच्या तर आळंदीच्या देऊळवाड्यातून संत ज्ञानोबाच्या पालखीचे समारंभपूर्वक पालखी सोहळ्याचे 'प्रस्थान' ठेवले जाते.

**लाऊनि टाळ मृदंग वीणा।**
**सेवू ब्रह्मरस आवडीने।'**

असा तो ब्रह्मरसाचाच सुखसोहळा असतो.

## पालखी सोहळ्याचे स्वरूप

विविध ठिकाणाहून विविध गावाहून विविध संतांच्या आषाढी यात्रेसाठी पायी पंढरपूरी येणाऱ्या पालख्यांची संख्या सुमारे १५०-२०० इतकी असून प्रत्येक पालखीमध्ये कमी-अधिक संख्येने दिंड्या असतात. संत ज्ञानेश्वरांच्या पालखीत सोहळ्यात सर्वाधिक दिंड्या असतात. ज्ञानेश्वर पालखी पूर्वी रथाच्या पुढे २३ व मागे २३ दिंड्या चालत होत्या. दिवसें दिवस दिंड्यांची संख्या वाढत असून नव्या नव्या दिंड्यांना पालखीच्या मागे क्रमांकानुसार अधिकृत नंबर देण्यात येतो. असा अधिकृत नंबर मिळण्यास दिंडी सातत्याने ३-४ वर्षे न चुकता दरवर्षी चालत यावी लागते. सध्या ज्ञानेश्वरांच्या रथामागे सुमारे ११० दिंड्या चालतात ही संख्या दरवर्षी वाढत आहे.

## दिंडीची वैशिष्ट्यपूर्ण रचना

प्रत्येक दिंडीत भगवे निशाण धरलेले वारकरी सर्वात पुढे, त्यामागे टाळकरी, मध्ये मृदंग आणि त्यामागे दिंडीप्रमुख वीणेकरी आणि त्यामागे बायका अशी रचना असते. दोन रांगेत हे सारे वारकरी मोठ्या शिस्तीने व ठरलेले ठिकाण न सोडता चालतात. यामुळे प्रत्येक दिंडीही स्वयंशिस्तीत आढळते व कोठेही शिस्त लावण्यासाठी पोलीसांची गरज पडत नाही. हे पालखी सोहळ्याचे वैशिष्ट्य आहे. प्रत्येक दिंडी कमीत कमी १०० ते जास्तीत जास्त ५०० वारकरी असतात. ही संख्या कमीअधिक असते. आणि अशा प्रकारे प्रारंभी पालखी सोहळ्यात सुमारे ४० ते ५० हजार वारकरी असतात. पंढरीत पोहोचेपर्यंत ही संख्या प्रत्येक मुक्कामास वाढत वाढत सुमारे लाखाच्या घरात जाते. नेमाच्या वारकऱ्यांशिवाय हौसेने-कुतुहलाने पालखी सोहळ्या समवेत चालत पंढरीस येणारा वर्गही खूप मोठ्या संख्येने असतो.

पालखीचे मुक्काम, विश्रांतीची स्थाने, अल्पाहार व जेवणाची ठिकाणी पूर्व नियोजित असतात. एवढा प्रचंड जनसमुदाय १५-१६ दिवसांचा पायी प्रवास, आणि सर्व कार्यक्रमांची पूर्वनिश्चिती प्रमाणे विना तक्रार अंमलबजावणीही पालखी सोहळ्याची वैशिष्ट्य. एक दिवस या पालखी सोहळ्यात पायी चालले म्हणजे आपल्या प्रत्यंतरास येतात आणि पालखी सोहळा म्हणजे वारकरी संतांनी केलेला चालता बोलता प्रतितीयुक्त असा चमत्कार वाटू लागतो.

## तात्त्विक अधिष्ठान

संतांच्या जीवनातील चमत्कार मानवी लौकिक जीवनातील अनुभवाशी जुळत नाहीत म्हणून या चमत्कार कथा म्हणजे दंतकथा आहेत असे अनेक विज्ञाननिष्ठ-बुद्धीनिष्ठाचे मत असते. पण अशा बुद्धीवाद्यांनी केवळ एक दिवस वेळ काढून पालखी सोहळ्यात यावे म्हणजे त्यांना संतांच्या नावावर घडत असलेल्या एका अनोख्या चमत्काराची लोकविलक्षण प्रचिती येईल. पालखी सोहळा म्हणजे केवळ पायपीट नव्हे. तर त्यामागे मोठे तात्त्विक अधिष्ठान आहे. भक्तीच्या नवविध प्रकारांतील इष्टदेवतेकडे 'अभिगमन' या प्रकारचे पालखी हे मूर्त दर्शन आहे असे वै. धुंडामहाराज देगलूरकर यांचे

प्रतिपादन आहे.

## हैबतबाबांचे बीजारोपण

आळंदी ते पंढरपूर असा आज जो पालखी सोहळा आपणास दिसतो तो वै. हैबतबाबा अरफळकर यांनी प्रारंभ केलेला आहे. या पालखी सोहळ्यापूर्वी देहूचे नारायण महाराज यांनी संत तुकाराम महाराज व संत ज्ञानदेव महाराज यांच्या पादुका घेऊन पालखी सुरु केली होती पण पुढे ती काही कारणामुळे बंद पडली आणि वै. हैबतबाबा यांनी आळंदी ते पंढरपूर संत ज्ञानदेव महाराजांच्या पादुका घेऊन नव्याने पालखी सुरू केली. तीच परंपरा गेली कित्येक वर्षे अव्याहतपणे चालू आहे. वै. हैबतबाबा यांना हा पालखी सोहळा सुरु करण्यास त्यांचे एकेकाळचे सरदार सहकारी श्रीमंत शितोळे यांनी लवाजमा देऊन मदत केली तसेच वै. मल्लाप्पा वासकर यांनीही याकामी विशेष मदत केली. हैबतबाबांचा पालखीचे प्रवर्तक या नात्याने संत ज्ञानेश्वर पालखी सोहळ्यात विशेष मानाचे स्थान आहे. त्यांच्या वीण्याला या सोहळ्यात अनन्यसाधारण मान आहे. हैबतबाबांचे वंशज निवृत्तीबुवा अरफळकर नुकतेच वैकुंठवासी झाले असून त्यांचे सुपुत्र बाळासाहेब अरफळकर हे सध्या आपल्या पूर्वजांची परंपरा पुढे चालवित आहेत.

## अनिर्वचनिय आनंद

जेष्ठ वद्य अष्टमी हा ज्ञानदेवांच्या पालखी सोहळ्याच्या प्रस्थानाचा दिवस ठरलेला असून संत तुकारम महाराजांच्या पालखी सोहळ्याचे प्रस्थान ज्येष्ठ वद्य सप्तमीला होते. न कळविता, न बोलविता या सोहळ्यासाठी हजारो वारकरी कसे येतात? असा एक प्रश्न मला एका विदेशी पत्रकाराने विचारून यासाठी केवढा मोठा पत्रव्यवहार करावा लागत असेल याबद्दल आश्चर्य व्यक्त केले होते. हे त्याचे आश्चर्य हे पालखी सोहळ्याचे वेगळेपण आहे. येथे कोणी कोणाला बोलवत नाही, ना निमंत्रण, ना निमंत्रण पत्रिका. प्रत्येकजण स्वच्छेने, कोणत्याही मानपानाची अपेक्षा न ठेवता, हाल अपेष्टा सहन करून येथे येत असतो. आणि आपली वारी चुकली नाही याचे समाधान-आनंद मिळवित असतो. एवढी १५ दिवस पायपीट करून या वारकऱ्यांना काय मिळते? असा त्या विदेशी पत्रकाराचा दुसरा प्रश्न होता. आता याचे उत्तर शब्दात सांगता येणे कोणाही वारकऱ्याला शक्य नव्हते. कारण पालखी समवेत पंढरीची वारी करण्याचा आनंद हा अनिर्वचनीय आहे. तो शब्दात सांगण्याचा नव्हे तर प्रत्यक्ष प्रतिती घेण्याचा आनंद आहे. साखर गोड आहे म्हणजे काय आहे? या प्रश्नाचे उत्तर शब्दापेक्षा साखर तोंडात टाकल्यावरच जसे कळते तसेच पंढरीच्या वारीने काय मिळते? हा प्रश्न, वारी केल्यावर राहातच नाही.

## नाम व ज्ञान दोघेही देवरुप

आळंदी ते पंढरपूर, देहू ते पंढरपूर, त्र्यंबकेश्वर ते पंढरपूर, पैठण ते पंढरपूर, एदलाबात ते पंढरपूर, नागपूर ते पंढरपूर अशा पायी चालत येणाऱ्या विविध संतांच्या पालख्या म्हणजे एक लोकजागरण आहे. वाटेतील गावांना भक्तीप्रेमाने चिंब झालेल्या अभंगवाणींने तृप्त करीत. बोधामृताचे सिंचन करीत हे पालखी सोहळे पंढरीस येत असतात. पालखीतील वारकरी केवळ पायी चालत नसतात तर मुखाने संतवाणीचा जयघोष करीत असतात. नामस्मरणाला-नामघोषाला या सोहळ्यात अनन्यसाधारण महत्व आहे. **'नामापरते तत्त्व नाही रे अन्यथा'** असे नामाला तत्त्वाचे स्थान देणाऱ्या वारकरी संप्रदायाला अनेक जण 'नामधारकांचा पंथ' म्हणतात ते यामुळेच! येथे **ज्ञानालाही** महत्व आहे, येथे **नामालाही** महत्व आहे. **ज्ञान आणि नाम दोघांनाही देवरूप मानणाऱ्यांचा हा संप्रदाय आहे.**

पालखी सोहळ्याला 'केवळ पायपीट' म्हणणाऱ्याना टीकाकारांना या सोहळ्यामागे दडलेला अर्थ कळत नाही, कळला नाही हेच खरे. कारण हा पालखी सोहळा म्हणजे **'सहना ववतु सहनौ भुनक्तु सह वार्यं करवावहै।'** अशा सहजीवनाचाच एक सुंदर अविष्कार आहे. सर्वांनी बरोबर चालणे, बरोबर खाणे, बरोबर नामसंकीर्तन करणे या गोष्टी समाजातील एकता-एकात्मता अधिक दृढ करणाऱ्या आहेत. सामाजिक एकतेचा पालखी हा मूर्त सोहळा आहे. व्यसन मुक्तीचे व समाजात नीतीमूल्ये जतन करण्याविषयी जागृकता निर्माण करण्याचे शब्दातीत कार्य पालखी सोहळ्याच्या प्रदीर्घ परंपरेने केलेले आहे. या कार्याबद्दल आपण संतांचे सदैव कृतज्ञच राहिले पाहिजे. ||हरि ओम||

■ ■ ■

## महाराष्ट्रा बाहेर संतांनी वर्णीलेले 'पंढरी महात्म्य'

# भीमाके तट निकट पंढरपूर

### संत कबीर

पंढरीचा महिमा संत ज्ञानेश्वर पूर्वकाली सुद्धा दुमदुमत होता. हे आद्य शंकराचार्यांच्या पंढरपूर भेटीवरून व त्यांच्या 'श्री पांडुरंग अष्टक' या संस्कृत स्तोत्रावरून दिसून येतो. तसेच पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात असलेले ज्ञानेश्वरपूर्वकालिन सुदूर पसरलेला अगाध महिमा वर्णन करणारे ऐतिहासिक पुरावेही आहेत. विविध पुराणांमध्ये आढळणाऱ्या पुंडलिक-विठ्ठल कथा पंढरीच्या प्राचीनत्वाच्या पुराणत्वाच्या साक्षी आहेत.

वारकरी संताप्रमाणे हिंदी भाषिक संत कबीर, कमाल यांनीही पंढरीचे महात्म्य गायलेले आहे. यावरुन उत्तर भारतातही श्रीक्षेत्र पंढरीचे महिमान भाषेच्या सीमापार करून पोहचले होते. विठ्ठलाने ज्ञानदेव-तुकारामाप्रमाणे हिंदी भाषिक कबीर-कमाल यांनाही वेध लावलेला होता.

**भीमाके तट निकट पंढरपूर**
**अजब छेत्र सुखदाई।**
**टाल वीना और मृदंग**
**बजावत संतनकी बादशाही।।**

असे ज्ञानदेव-तुकारामांसारखे कबीरने पंढरीचे क्षेत्रवर्णन गायलेले आहे. **"कहत कबीर सुनो भाई साधु तुलसी और बुका। और कुछ मांगे नही भाव भक्तीसे भूका।।"** या ओळीतून कबीराने वारकरी संप्रदायात 'तुळसी व बुक्का' यांना असलेले अनन्यसाधारण स्थान मोठ्या बारकाईने निरीक्षण करून कथन केलेले आहे.

**सब आलमका रखनेवाला**
**विठ्ठल पंढरपूरवाला**

श्री विठ्ठलाचे असे वर्णन करून आपण आषाढी एकादशीच्या शुभदिनी पंढरीचा वारकरी झालो असे कबीर एका दोह्यात सांगतात. कबीराने ७-८ दोह्यांमध्ये केलेले पंढरीक्षेत्र वर्णन म्हणजे कबीरकृत पंढरी महात्म्यच आहे.

### संत कमाल

**कबीरा प्रमाणेच हिंदी भाषिक संत कमाल याने केलेले पंढरी वर्णन पर दोहे अभंगांसारखेच भावभक्तिने भारलेले आहेत.**

**शामसुंदर देखो बिटपर**
**विठ्ठल खडा पंढरपुरमें।**

श्री विठ्ठलाचे शामसुंदर, 'साई' म्हणून वर्णन करणाऱ्या कमाल ने 'छत्रपती राजा' अशा विशेषणाने विठ्ठलाला गौरवलेले आहे. **'विठू साई देखो छत्रपती राज रखुमाबाई।** रुप व नाव नसलेले परमात्म्याचे निर्गुण स्वरुप भीमे-काठी भक्तांसाठी सगुणरूप घेऊन उभे ठाकलेले आहे असेही कमाल विठ्ठलाचे गुणवैशिष्ट्य कथन करतो.

### संत नरसी मेहता

कबीर-कमाल या हिंदी भाषिक संताप्रमाणे गुजरातमधील महानसंत नरसी मेहता यानेही पंढरीचे-विठ्ठलाचे भक्तीभावाने गुणगायन केलेले आहे.

**उठ उतावळो याल्यने विठ्ठला।**
**गोविंद गायने वच्छ धावे।।**

अशी गुजराती थाटीची काव्यरचना वाचताना मराठी भाविक वारकऱ्यांचे उर आनंदाने भरून न आले तरच नवल.

**कोण आगल जई विनवुं विठ्ठला।**
**श्रीपति लाज राखोना महारी।।**

माझी लाज राखा श्रीपती अशी एखाद्या मराठी संताने विनवणी करावी तशीच विनवणी नरसी मेहता ने आपल्या वरील पदामध्ये केलेली आहे.

**दादू पिंजारी, सजन कसाई** या अमराठी भाषिक संतांनी सुध्दा पंढरी महात्म्यपर पदें लिहीलेली आहेत.

**कहे दादू जोग जुगत नही**
**विठ्ठल हमारा सारथी।**
**धंदा किया श्रीविठ्ठल बंदगी।**
**हाक कहे दादू पिंजारी**
**विठ्ठल नाम कहो।।**

पंढरीचा क्षेत्र महिमा महाराष्ट्राच्या सीमा पार करून दक्षिणेत उत्तरेत कसा गाजत होता हे वरील अमराठी भाषिक संतांच्या दोहे-पदावरून लक्षात येते.

**— पंढरीनाथ पाटील**

# साई शिकवण: श्रद्धा-सबुरी

जनार्दन बांदेकर

*कै. हेमाडपंताचे साईसच्चरित्र अनेकांना प्रेरणादायी ठरलेले आहे. अशीच प्रेरणा घेऊन श्री. बांदेकर यांनी साईबाबांचे जीवन व त्यांची शिकवण याविषयी केलेले सुबोध लेखन.*

*कथारुप सोपेसुलभ अशा वाचनाची आवड असणाऱ्या बाळबोध वाचकांसाठी*

धूपगावचे पाटील श्री. चांदभाई यांच्या भाच्याचे शिर्डी गावातील एका शेतकऱ्याच्या मुलीबरोबर लग्न ठरले. लग्नाच्या दिवशी मुलगा घेऊन चांदभाई लग्न लावण्यासाठी शिर्डीला निघाले. त्यावेळीं लग्नाच्या वरातीबरोबर एक मुलगा शिर्डीला आला. वरात शिर्डीला मंदिराजवळ थांबली. खंडोबा मंदिराचे पुजारी म्हाळसापतींचे लक्ष त्या मुलाकडे गेले असता, "या"! अशा तऱ्हेने हाक मारली. आणि त्यावेळेपासून त्या मुलास "साई" हे नांव पडले. १६ वर्षाच्या त्या मुलाच्या चेहऱ्यावर एक आगळेच तेज दिसत होते.

साईबाबा लग्नसमारंभाला न जाता साठ्यांच्या वाड्यासमोरील कडुलिंबाच्या झाडाखाली बसले. साईबाबांना कडूलिंबाच्या झाडाखाली बसलेले पाहून शिर्डी गावातील लोक आपापसात चर्चा करीत. कोण ही व्यक्ति? कुठून आली? इत्यादि इत्यादि. उन्हातान्हात, पावसात, थंडीत बसलेल्या साईबाबांना पाहून कांही गृहिणी जेवण, पाणी इ. साईबाबांना देण्यासाठी आणीत. परंतु कोणत्याहि वस्तुंचा साईबाबा स्विकार करीत नसत. ते कुणाबरोबर बोलत सुद्धा नसत. त्यामुळे साईबाबा कोण? हे शेवटपर्यंत लोकांना समजले नाही. शिर्डीच्या जाणकर गावकऱ्यांनी खंडोबाच्या पुजाऱ्याला (म्हाळसापतींना) एका मंगळवारी रात्री अंगात वारे आले असता विचारले, देवा! कडुलिंबाच्या झाडाखाली बसलेली व्यक्ती कोण? आणि शिर्डी गावाला कशासाठी आलेली आहे? त्यावेळी पुजाऱ्यानी उत्तर दिले. सकाळी प्रत्यक्ष त्या व्यक्तिला विचारा आणि उत्तर घ्या. त्याप्रमाणे गावकरी सकाळ होताच कडुलिंबाच्या झाडाकडे साईबाबांजवळ आले आणि त्यांनी विनंती केली. साई! आपण कोण? आणि ह्या जागी कोणत्या उद्देशाने आला आहात? त्यावेळी साईबाबा बोलते झाले. ही माझ्या गुरुची पवित्र जागा. ह्या जमिनीखाली समया आहेत. लगेच गावकऱ्यांनी कुदळी, फावडी खोरी आणून जागा खणून पाहिली तर—एक मोठे भूयार सांपडले. आणि खरच त्यामध्ये चार समया होत्या. गुरुंची भांडी, कपडे लाकडी खडाव, आणि इतर वस्तू सापडल्या. हे पाहून गावकऱ्यांचा साईबाबांवर विश्वास बसला. पुढे साईबाबांनी स्वत: एक छोटीसी बाग तयार केली. रोज खांद्यावर घागर घेऊन झाडांना पाणी घालीत.

दररोज नित्याने फक्त पाच घरी जाऊन भिक्षा मागत. भिक्षेतून मिळालेले अन्न साईबाबा कुत्री, मांजरे, भिकारी इत्यादिंना वाटून, उरले सुरलेले स्वत: खात.

पुढे पुढे साईनी एका पडक्या जीर्ण मशिदीमध्ये आपले वास्तव्य केले. ती मशीद म्हणजे कुत्र्या मांजरांची विश्रांतीची जागा होती. कुणीही माणूस त्या ठिकाणी जात नव्हता. पावसाळ्यात आतील

जागा ओली चिंब झालेली असे. कुणी उभा सुद्धा राहणार नाही अशी ती जागा होती. कुणा दोघा चौघांना हालणार नाही असा एक दगड मात्र तिथे होता. कंटाळा आल्यानंतर विश्रांतीसाठी साईबाबा त्या दगडावर बसत असत. अजूनहि तो दगड त्या मशिदीमध्ये आहे.

## द्वारकामाई

कालांतराने साईबाबांनी मशिदीमध्ये एक-छोटी चूल बनविली. त्यावर ते स्वत: अन्न शिजवीत आणि भिकाऱ्यांना व इतर प्राण्यांना वाटून टाकीत. मशिदीमध्ये काही जाणकार माणसे साईबाबांच्या सानिध्यात सेवेसाठी जमू लागली. त्यामध्ये खंडोबाच्या मंदिरातील पुजारी म्हाळसापती, खानदेशातील जामनेर गावचे मामलेदार श्री. नाना साहेब, चांदोरकर, नागपूरचे श्री. गोपाळशेट बुट्टी (ज्यांनी समाधी मंदीर बांधले) श्री. सिताराम दिक्षीत. (ह्यांनी प्रथमत: शिर्डीला वाडा बांधला). साईबाबा प्रथम प्रथम मनाला येतील तसे बोलत. तरीसुद्धा ह्या भक्तांनी साईबाबांची सेवा करण्याचा ठाम निश्चय केला. आणि हे सर्व साईंचे खरे भक्त बनले. सेवक बनले. साईबाबांनी आपल्या हातानी लाकडे टाकून मशिदीमध्ये धुनी पेटविली. आणि मशिदीला "द्वारका माई" असे नांव दिले.

केव्हा केव्हा श्री साईबाबा शिर्डी गावाच्या बाहेर तासन तास भटकत असत. तर कधी कधी झाडाखाली निवांतपणे आकाशाकडे रोखून पहात बसत. अशावेळी बायजाबाई साईंना भाकरी, चटणी, भाजी आणि-पाण्याचा तांब्या घेऊन जाऊन, जबरदस्तीने जेवू घाली. आणि नंतरच घरी येऊन स्वत: भोजन करी. एखादी व्यक्ति कोणत्या उद्देशाने आपल्याजवळ आलेली आहे, ह्याचे पूर्ण ज्ञान साईबाबांना होते. गावामध्ये कुणी आजारी असला तर आपल्या हातांनी धुनीतील उदी त्याला देऊन बरा करीत. आणि आशिर्वाद देत— "अल्ला भला करेगा"!

दिवाळीच्या वेळी साईबाबा स्वत: गावातील दुकानांवर जाऊन वाण्यांकडून तेल मागून आणीत आणि मशिदीमध्ये पणत्यांचा लखलखात करीत. परंतु पुढे पुढे वाण्यांनी फुकट तेल देण्याचे नाकरले असता एके दिवशी सगळ्या पणत्यांत तेला ऐवजी पाणी घालून पणत्या पेटविल्या. आणि त्या रात्रभर पेटत राहिल्या. ही एक आत्मविश्वासाची गोष्ट श्री साईबाबांनी भक्तांना दाखवून दिली. जीवनात प्रत्येकाला सुख आणि दु:ख येते. साईभक्तांवर अनेक संकटे येतात. परंतु त्या संकटाना धैर्यने सामोरी जायला हवे. परमेश्वराचे स्थान आहे. तर मग त्यांनी मृगजळाप्रमाणे परमेश्वराला इथे तिथे शोधण्यासाठी का बरे धावावे? प्रत्येक भक्ताने प्रथमत: आपले कुटुंब घर-दार, प्रपंच ह्याकडे सपूर्ण लक्ष दिला पाहिजे. केवळ भक्तिने परमेश्व आपणाला बसल्याजागी अन्न, वस्त्र, सुख-संपत्ती इ.



द्वारकामाई मशिदीत बसलेले साईबाबा!

देणार नाही. त्यासाठी प्रत्येकाने जास्तीत जास्त कष्ट मेहनत करायला हवी. तरच त्यांत यश म्हणून ईश्वर दुप्पट देईल. आणि भक्ताला सुखाचा मार्गाकडे जाता येईल.

रात्र-दिवस परमेश्वराची पूज-अर्चा करण्याची जरुरी नाही. मन:पूर्वक श्रद्धने दिवसातून निदान एक वेळातरी परमेश्वराचे स्मरण केल्याने आपण पावन होऊ. उगाच पैसा उधळू नये. अंधश्रद्धेला बळी पडू नये असे शिकवण देणारे साईबाबा एक महान संत होते. साईबाबांच्या पदस्पर्शाने शिर्डी पावन झाली. आणि म्हणून आज मुंग्यांच्या वारुळाप्रमाणे भक्त शिर्डीला, श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी धाव घेतात.

**साईबाबांची शिकवण:**

सर्व धर्मीयांनी आपआपल्या धर्माचे पालन करुन आपल्या धर्माइतकचा दुसऱ्याचा धर्म श्रेष्ठ आहे. असे मानावे मग तो हिंदु असो, मुसलमान असो, किंवा शिख, पारसी. प्रत्येकाला आपल्या धर्माविषयी प्रेम आहे हे प्रत्येकाने समजून घेतल्यास आपापसात भांडण तंटे होणार नाहीत. माणसाने माणसावर प्रेम केल्यास कुणाच्याहि मनामध्ये द्वेष, मत्सर घृणा निर्माण होण्यासाठी जागा असणार नाही. अशी थोर शिकवण साईबाबांनी दिली.

श्री साईबाबांनी आपल्या प्रिय भक्तांना एकच मंत्र दिला तो म्हणजे 'श्रद्धा सबुरी'. आपण त्या मंत्राचा अंगिकार करून आपले जीवनही सुखी समाधानी व सफल बनवावे.

■ ■ ■

---

# आनंदाची खाण

**शाम जुवळे**

साई-साई नाम साजिरे
अमृतमय ते गोड असे।
मनात रुजता नाम गोजिरे
साईकृपा ती खचित असे ॥१॥

सुखासवे जव नाम खेळते
प्रसन्नता तव तिथे दिसे।
मन साक्षि जव तिथे ठाकते
तीच साईची लीला असे ॥२॥

कर्म करिता फलाशा नसे
भोग जिवाचे भोगितसे।
मन यावरी जव मात करिते
तिथे कुशलता खरी दिसे ॥३॥

दांभिकता जी जगी या वसे
अज्ञान तियेचे रुप असे।
ज्ञानाची जव पहाट उगवे
प्रसन्नतेस मन पावतसे ॥४॥

उणेदुणे ते शद्ब जगाचे
अंध:कारचि दावितसे।
प्रकाश जव तो मनात पसरे
शद्बां गोडी वाढतसे ॥५॥

वादावादीस ऊत येतसे
तव दुफळी जगी या माजतसे।
ज्ञानी मन मग हार खातसे
ज्ञानाचे ते सार असे ॥६॥

नानाविध दु:खांनी भरले
म्हणुन जगी या सुख नसे।
आनंदाची जव खाण गवसे
दु:खाला मग वाव नसे ॥७॥

दु:खची घेवुन रुप सुखाचे
जनांस इथल्या गांजितसे।
छंद मना जव तुझा लागे
खंत मुळीच ना तिथे असे ॥८॥

छत्र शिरावर तुझ्या कृपेचे
तेच जिवासी रक्षितसे।
कृपा जिवावर तुझी असुदे
याविण मागणे दुजे नसे ॥९॥

# पाऊले चालती शिरडीची वाट

**भालचंद्र के. गन्द्रे,** ठाणे

***स्वामी समर्थ व श्री साईबाबा यांच्या पादुका घेऊन बदलापूर ते शिरडी अशी पदयात्रा डॉ. देव व आठल्ये गुरूजी आदी मंडळीने केली. दि. ४ ते १७ सप्टेंबर ९५ काळात झालेल्या या आनंदयात्रेचे वर्णन साईभक्तांना निश्चितच प्रेरणादायी वाटेल.***

बाबा शिर्डीत असताना आपल्या प्रिय भक्तांना त्यांनी कधी पैशाची नाणी दिली, कुणास पादुका दिल्या तर कुणास कफनी दिली. त्या त्या चीजवस्तू प्राणापेक्षा अधिक मोलाने ज्यांनी जपल्या, ज्यांनी त्याचे महत्व जाणले व बाबांवर विश्वास ठेवून ज्यांनी सातत्याने त्यांची नाम जप रुपी सेवा केली, त्या भाग्यवंतांचे भाग्य दिवसेंदिवस वाढतच गेले. समाजांत त्यांना आदराचे-मानाचे स्थान गवसून त्याचा नावलौकिकही झाला. मात्र ज्यांना बाबांच्या या दान-वस्तूंची महती कळली नाही त्याची त्यांनी जपणूक केली नाही, त्या भाग्यवंतांच्या पुढल्या पिढीला मात्र बाबांचा कृपाप्रसाद हवा तसा लाभला नाही.



कै. बाळासाहेब देव यांना ''बाबांचे बाळ'' म्हणून आळखत असत. बाळासाहेब डहाणू येथे मामलेदार होते. बाबांच्या दर्शनाच्या कृपा प्रसादाचा लाभ त्यांना मिळाला होता. त्यांची पत्नी फार व्रतवैकल्ये करीत असे. व्रताच्या उद्यापनाच्या दिवशी बाबांनी प्रत्यक्ष येऊन आपले घर पवित्र करावे अशी इच्छा श्री. देवांना झाल्याने तसे विनंतीवजा पत्र त्यांनी शिर्डीला श्री. बापूसाहेब जोग यांना पाठविले होते. हे पत्र लिहिण्याच्या अगोदर काही दिवस एक संन्यासी गोरक्षणाकरिता निधी गोळा करण्यास डहाणू येथे आला होता. त्याला चार एक महिन्यांनी यावयास श्री देवांनी सांगितले होते. पत्र शिर्डीत पोहोचल्यावर ते बाबांना वाचून दाखविण्यात आले. त्यावेळी माधवराव (श्यामा) व जोग बाबांपाशी होते.

बाबा त्यांना म्हणाले "तू, मी व जोग असे तिघे डहाणूला देवांकडे जावू."

त्याप्रमाणे श्री. देवांना उत्तर मिळाल्यावर बाबा येणार या बातमीने त्यांना अत्यानंद झाला. उद्यापनाची पूजाविधी संपले. जेवणाची पाने मांडून, सर्वजण बाबांच्या आगमनाची वाट पहात होते. तेव्हा पूर्वी भेटलेले संन्यासी येताना दिसल्यावर ही ब्याद आतां निधीकरिता त्रास देणार असे देवांना वाटले. पण त्या संन्यासाने सांगितले, "आपल्या बरोबर दोन शिष्य आहेत व त्यांनाही भोजनाची अपेक्षा आहे. श्री. देवांनी त्यांना अगत्याने जेऊ घातले. जेवल्यावर तृप्त मनाने आशीर्वाद देतांना ते म्हणाले "रावसाहेब आज फक्त जेवावयास आलो होतो हो, मनाची तृप्ती झाली, आतां जातो" ते तिघे जेवून गेले पण वाट पाहूनहि बाबा पत्राप्रमाणे जेवावयास आले नाहीत याबद्दल श्री. बापूसाहेब जोगांना पत्र पाठवून श्री. देवांनी चौकशी केली. त्यावर बाबांनी प्रत्युत्तर दिले की, "मी कधीच खोटे बोलत नाही. मी तुझ्याकडे येऊन गेलो. पण तूं मला ओळखले नाहीस, त्याला मी काय करु? चार महिन्यांनी बोलाविलेला संन्यासी परत का आला असा तुला संशय आला म्हणून दोन शिष्यांसह मी आलो असून, मला जेवणाची अपेक्षा आहे असा मी खुलासा केला होता." श्री. देवांना जेव्हा हे पत्र मिळाले त्यावेळी त्यांना गहिवरून आले व बाबा प्रत्यक्ष घरी येऊन जेवून गेले तरी आपण त्यांना ओळखू शकलो नाही याबद्दल त्यांना खूपच वाईट वाटले. देव बाबांच्या कृपा छत्राखालील कुटुंब, मग त्यांनी बाबांची क्षमा मागितली. पुढे ते बाबांचे एकनिष्ठ सेवक बनले. बाबांच्या पुण्यतिथीच्या दिवशी ते बाबांच्या चरित्रांतील कथांवर सुंदर कीर्तने करीत असत. ते शिर्डी संस्थानचे विश्वस्त सुध्दा होते. बाबांची मनसोक्त सेवा करून दिनांक १/१/१९४६ रोजी त्यांचे निर्वाण झाले. त्यांच्या पश्चात त्यांचे चिरंजीव श्रीपाद यांनीही कीर्तन परंपरा तशीच पुढे चालू ठेवून त्यातील पाच कीर्तनाचे "कीर्तन पंचक" या नावाचे पुस्तक संस्थानाच्या सहाय्याने प्रकाशित केले. पुढे शिर्डी संस्थानाच्या विश्वस्त पदीही त्यांची नियुक्ती झाली. अशा रितीने त्यानीही बाबांची चांगलीच सेवा केल. बाबांच्या कृपाछत्राचे हे सेवाव्रत देव कुटुंबाकडे सातत्याने वंशपरंपरेने पुढे चालू असून सद्यः श्रीपादांचे पुतणे डॉ. माधव देव हे ही बाबांवर व अध्यात्मावर आपल्य रसाळ-गोड वाणीने अधिकार संपन्न कीर्तने-प्रवचने करीत आहेत. त्यांचा हसरा-गोड स्वभाव व बाबांची कृपा यामुळे त्यांच्याकडे येणारे पेशंटही नेमका झटपट उपचार होऊन भक्तिमार्गाकडे वळत आहेत. डॉक्टरांनी अशी बरीच माणसे आपल्या गोड स्वभावाने जोडली आहेत. आपल्यांत रमणारा, लाघवी बोलणारा, तासनतास गप्पा मारणारा हा साई-सेवक डॉक्टर आहे, हे कळल्यावर मात्र अचंबा वाटतो. बाबांची सेवा आपल्या हातूनही घडावी यासाठी त्यांच्या राहत्या घरांत (आराधना बिल्डींग, चेंदणी, ठाणे) त्यांनी द्वारकामाईचा देखावा तयार केला असून, अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर (दिनांक २/५/१९९५) बाबांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली आहे. त्यांच्या या कार्यास त्यांच्या बंधूनी चांगलाच प्रतिसात दिला असून त्यांचे एक बंधू श्री. रमेश यांनी स्वयंप्रेरणेने बाबांच्या चांदीच्या पादुका करून त्यांचीही स्थापना या द्वारकामाईत गुरूपौर्णिमेला केली आहे. देवांचे सर्व खानदान चांगले सुविद्य असून सर्वजण बाबांच्या सेवेत आहेत. बाबांच्या कृपेचा प्रसाद एखाद्या कुटुंबावर कसा होतो व वर्षानुवर्षे वंशपरंपरेने त्यांचे सेवाव्रत कसे चालू रहाते याचे देव कुटुंब हे एक उत्तम उदाहण आहे.

## ।। शिर्डी पदयात्रा ।।

बाबा आपल्या भक्तांस कशी बुद्धि देऊन सेवा करवून घेतात ह्या ही घटना मजेशीर असून त्याचाही मागोवा घ्यावयास हवा. बदलापूरला श्री. सुमंत आठल्ये गुरूजी यांनी श्री स्वामी समर्थ वाडी, कुळगांव येथे

स्वयंप्रेरणेने श्री अक्कलकोट स्वामींचे मंदिर उभारले असून तेथे दत्त, मारूती यांची प्रतिष्ठापना केली आहे. त्यांच्याकडील स्वामींच्या वटपत्रशायनी काष्ठपादुकांसह शिर्डीची पदयात्रा करावी असे गुरूजींनी ठरविले. संतभूमीला भेट देताना पायी प्रवास करावा, तेथील परिस्थितीचे, माणसांचे त्यांच्या वृत्तीचे जवळून दर्शन घ्यावे व प्रभू-नामाचा प्रचार करीत करीत पालखी काढून शिर्डी गाठावी यासाठी त्यांनी पद्धतशीर नियोजनबद्ध आखणी करून आपल्या पन्नास साथीदारांसह पदयात्रा काढली. ह्या पदयात्रेत आपण सामील व्हावे अशी डॉ. देवांना अंत:प्रेरणा झाली. मी येतोच पण स्वामींच्या पादुका पालखीतून शिर्डीला न्याव्या अशी त्यांनी श्री. आठल्ये गुरूजीना विनंती केली. स्वामी व बाबांच्या पादुका शिर्डीला नेण्याचा योग जुळून येतोय हे संकेताने ध्यानी येताच गुरूजीनी या सूचनेस तात्काळ संमती दिली. मग ठरल्याप्रमाणे एका पालखीत श्री अक्कलकोट स्वामी व साईबाबांच्या पादुका तसेच श्री आनंदनाथ महाराज (येवला) यांची प्रतिमा ठेवून पदयात्रा दिनांक ४ सप्टेंबर, १९९५ रोजी कुळगांव-बदलापूरहून शिर्डीस जाण्यास निघाली.

शंखनाद व नामाचा गजर करून पदयात्रेस शिर्डीकडे प्रारंभ करण्यात आला. टिटवाळा, खडवली (स्वामी मंदिर), शहापूर असा पदयात्रेचा मार्ग आखण्यात आला होता. पालखी पुढे दोन अब्दागिरी, भगवे झेंडे, स्वामींचा दंडा, एका कमंडलूत तुळशीयुक्त पाणी व सतत स्वामीनामाचा व साईनामाचा गजर असे भारलेले वातावरण होते. पहाटे लवकर उठून स्नान-संध्या उरकल्यावर सूर्योदयापूर्वीच पदयात्रा चालू होई. मध्यान्हकाली जेवणासाठी वाटेतल्या गावातील मंदिरांत/धर्मशाळेत विसावा घेऊन पुन्हा सायंकाळपर्यंत अशी दररोज २० ते २२ किलोमीटर पदयात्रा होई. सूर्यास्तानंतर मात्र त्या त्या गावांत मुक्काम पडे. आपल्या गावांत स्वामींची/बाबांची पालखी आली या भावनेने सारे भाविक उत्स्फूर्त स्वागत करीत. तेथे मग जे काही भोजन मिळे ते घेण्यात येई. पदयात्रेत केव्हा-कुठेही कुणापुढेही अन्नपाण्याची याचना करायाची नाही असा गुरूजींचा दंडक होता. त्यामुळे जे-जे मिळेल त्यांतच तृप्त होऊन मार्गक्रमणा करीत पदयात्री पायी-पायी शिरडी मुक्कामी चालले होते. पदयात्रेत विविध ठिकाणी होणारे आदरातिथ्य, अध्यात्मिक वातावरण व येणारे एकेक अनुभव अचंबित करणारे व श्रद्धा वाढविणारे असेच होते.

शहापूरच्या पुढे आटगांव येथे पालखी आल्यावर गावांतली एक कुत्री सतत पालखी भोवती फिरु लागली. तीला थोडे अन्न दिल्यावर मात्र ती पालखीची पाठ सोडेना. सतत पालखी सोबत ती चालू लागली. त्यामुळे सारेच पदयात्री चक्रावले. वाटेत पालखी जेथे थांबे तेथे ती पदयात्रीसोबत थांबे. ते देतील तेवढे अन्न खाऊन तिनेही पदयात्रीयांना शिर्डीपर्यंत सोबत केली. उन्हातान्हांत सतत पालखीसोबत चालल्याने तिच्या पायाचे पंजे तांबूस झाले होते तरीही तिने शिर्डीची वारी केली. ह्या कुत्रीमुळे नवख्या गावांत कुत्र्यांचे जोरदार भुंकणे चालू होई व काय झाले हे पहाण्यासाठी सारे गांवकरी जमत नि अनायासे पालखी सोबत जाणाऱ्या पदयात्रींची गांवात जाहिरात होई. अशा रितीने पालखी सोबत एका कुत्रीची योजना करून जणू कांही गेल्या जन्मीची तिची अपुरी राहिलेली वारी बाबांनी ह्या पदयात्रेच्या रुपाने पूर्ण करुन घेतली.

### सत्पुरुषाचे दर्शन

पदयात्रा कसारा घाटात आली असता घाटाच्या एका टोकाला पांढरी दाढी वाढवलेला, लुंगी गुंडाळून कफनी घातलेला बाबांसारखा दिसणारा एक वृद्ध माणूस बसला होता. त्याच्याकडे बाबांची तसबिर होती. श्रद्धेने तेथे दर्शन घेऊन पदयात्रा पुढे निघाली. घाट जढताना मात्र साऱ्याच पदयात्रींची दमछाक होत

होती. वर प्रखर सूर्याची किरणे व खाली तापलेली वाट यामुळे पालखी घेऊन अनवाणी चालणाऱ्यांच्या पायाला चांगलेच चटके बसत होते. त्याही स्थितीत नामाच्या गजरात घाट एकदाचा पार केला. तेथे आणखी एक घटना घडली. घाट चढत असताना पुढून भगवी वस्त्रे धारण केलेल्या दोन व्यक्ति आल्या. त्यापैकी एकाची दाढी पांढरी होती तर दुसरा तरूण काळ्या दाढीत होता. गळ्यात रूद्राक्षाच्या माळा, हातात सटका कमंडलू अशा थाटीत त्या दोन व्यक्ति पालखी जवळ आल्या. तेव्हा त्यांना देऊ केलेली दक्षिणा न घेताच ते मौनांतच खाली उतरले. ह्या आसामी कोण असाव्यात ह्या विचाराच्या तंद्रीतच मग घाट पार झाला होता.

**ब्रह्मगिरी प्रदक्षिणा**

त्र्यंबकेश्वरला पोहोचल्यवर तेथील ब्रह्मगिरीस एक प्रदक्षिणा पूर्ण केली. (हे अंतर बरेच असून तेथे ११ टेकड्या आहेत) प्रदक्षिणा पूर्ण होताच तेथेच एक यज्ञकुंड तयार करुन मंत्रपठण करण्यात आले व शेवटी "यज्ञात भवती पर्जन्या:" हा श्लोक म्हणण्यात आला. आश्चर्य म्हणजे गेले कित्येक दिवस पाऊस नसलेल्या त्याठिकाणी तासाभरात छान पाऊस झाला. तेथून त्र्यंबकेश्वर मंदिरापाशी सारे आले तोच त्र्यंबकेश्वराची पालखी वाजतगाजत निघाली होती. ते दर्शन घेतल्यावर मग पुढे त्र्यंबकेश्वराचे हिरे माणकेजडीत मुकूट दर्शनही घडले.

निफाडच्या अलिकडे पिंपळस येथे पालखी आली असता, पूर्वी बाबांचे प्रत्यक्ष दर्शन घेतलेले बाबांचे समकालीन श्री. संभाजी आबाजी बोधारे (जन्म १९०२) यांची अचानक भेट झाली. बाबांच्या पादुका घेऊन पदयात्रा शिर्डीस निघाल्याचे पाहून त्यांना खूपच आनंद झाला होता. मग त्यांच्या तोंडून बाबांच्या लीला व पूर्वीच्या आठवणी ऐकतांना चांगलेच गहिवरुन आले.

**आनंदनाथ महाराजांच्या मठात**

येवल्याच्या अगोदर साबरगांव येथील आनंदनाथ महाराजांच्या मठांत पालखीचा मुक्काम होता. आनंदनाथ महाराजांनी या मठात दिर्घकाळ वास्तव्य केले होते. मठाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे, स्वत: श्री अक्कलकोट स्वामी येथे २ दिवस महाराजांसोबत राहिले होते. त्यामुळे ह्या पवित्र भूमीत राहिल्यावर वेगळीच अनुभूती मिळाली.

स्वामी व बाबांच्या पादुका असलेल्या पालखीचे स्वागत प. पू. मोरेदादा (दिंडोरी) प्रणीत निफाड, विंचूर, कोपरगांव येथील स्वामी केंद्रातर्फे अगत्याने करण्यात आले. पालखीत स्वामींच्या पादुका असल्याचे पाहून तेथील स्वामी सेवेकऱ्यांनी आग्रहाने सारी उत्तम बडदास्त ठेवली. या केंद्रात प्रत्येक पदयात्रीकडे जातीने लक्ष देऊन त्यांचा उत्तम पाहुणचार करण्यांत आला.

मजल-दरमजल करीत अशारितीने स्वामी व बाबांच्या पादुका असलेली पालखी घेऊन पदयात्री दिनांक १७ सप्टेंबर, १९९५ रोजी सकाळी ११ वाजता शिर्डीत पोहोचले. लेंडी बागेत पालखी ठेवण्यात आली होती. पूर्वी साई-संस्थानचे विश्वस्त असलेल्या कै. बाळासाहेब देव यांचे नातू डॉ. माधव देव हे बदलापूरहून स्वामी व बाबांच्या पादुका पालखीत घेऊन पदयात्रा करीत शिर्डीत आल्याचे पाहून प्रशासकानाही फार आनंद झाला. संस्थानच्या वतीने मग सर्व पदयात्रींची निवास-भोजनाची चांगली व्यवस्था करून, सर्वांना समाधी मंदिरात नेऊन बाबांचे दर्शन घडवून प्रसात देण्यात आला. बाबांच्या दर्शनाचे समाधान, पदयात्रेचा विलक्षण अनुभव उराशी घेऊन तृप्त मनाने, अनोखा आनंदात मग सारे पदयात्री पालखी घेऊन नामचिंतनातच मुक्कामी परतले.

■ ■ ■

# हरामाची कमाई

ह. ल. रानडे सातारा

***हरामचा पैसा झटपट मिळतो व माणूस बघता बघता श्रीमंत होतो हे खरे. पण हा पैसा सुख, समाधान देत नाही. पुराच्या पाण्यासारखाच हा पैसा येतो व पाणी ओसरावे तसा खर्च होतो. केवळ कष्टाच्या पैशाची श्रीमंतीच सुखसमाधान - शांती देऊ शकते.***

***आपण कोणता पैसा कमवितो? व आपण सुखी आहोत का? हे ज्याचे त्याने मनाला विचारायचे आहे. रानडे यांची उद्‌बोधक कथा आपणाला निश्चितच अंतर्मुख करेल असे वाटते.***

ताडपुळे गावात राणू म्हणजे अगदी गरीब माणूस. स्वभावाने अन् परिस्थितीनेही! रहावयास खोपटवजा एक घर पोटापाण्याची तर सदैव चिंताच पण अशी भयानक परिस्थिती असून सुद्धा राणू परिस्थिती बद्दल काहीच तक्रार करीत नसे. "ठेविले अनंते तैसेचि रहावे" ही संतोक्ति त्याने अगदी आपल्या वागण्यात पुरेपूर उतरविलेली.

स्वत:ची जमीन नसल्याने राणूना दुसऱ्याच्या शेतावर मजुरी करावी लागे. मजुरी मिळाली नाही तर उपास देखील काढण्याची पाळी येई. पण सुदैवाने धर्मपत्नी सुस्वभावी, कष्टाळू व प्रेमळ लाभली होती. त्यामुळे ती पण दुसऱ्याच्या घरी धुणं भांडी करुन प्रपंचात हातभार लावीत असे.

राणू जरी आनंदी दिसे तरी त्याची पत्नी खिन्न असे कारण बरेंच दिवस झाले तरी तिला मूल झाले नव्हते. राणू तिला सारखे समजावून सांगे की "अग! प्वार नाही ते बरय! आपण एवढं राबतया तवा कसतरी दोघांचं प्वाट भरतया! त्या तिसऱ्या जिवाले आपण काय खाया घालणार!" पण राणूच्या बायकोला ते पटत नसे. तिला वंशाचा दिवा हवा होता. म्हणून ती नवऱ्याला म्हणायची "अव! झालं ना तर करीन की मी जास्तीचे कष्ट! शिवाय कूस उजविण्यासाठी ती उपास तापास, देव देव पण करुन होती. अन् म्हणूनच की काय तिच्या नशीबाने तिला मुलगा झाला.

राणूची बायको त्यामुळे खूप आनंदली, तिने मुलाचे नाव श्रीपती ठेवले. मुलासाठी म्हणून तिने काही दिवसांनी आणखी दोन चार घरची कामे पण धरली. मुलगा हळूहळू मोठा होऊ लागला. पण त्याबरोबर त्याचा वात्रटपणाही वाढू लागला. त्यामुळे रोज कुणाची ना कुणाची तक्रार येऊ

लागली. आईवडिलांनी मुलाला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. धाक पण दाखवला पण त्याचा काहीच उपयोग होईना. त्यामुळे दोघे अगदी वैतागून गेली. होतां होतां श्रीपती पाच वर्षाचा झाला, तेव्हा राणूने त्याला शाळेत घातले. आपल्या सारखा तो अगदीच अडाणी राहू नये व मास्तरांच्या धाकाने त्याच्या खोड्या पण कमी होतील. अशी त्याची त्यामागे इच्छा होती. पण शाळेत सुद्धा गुरुजींना तो एक प्रश्नचिन्हच बनला. वर्गात मारामारी तरी करे किंवा मुलांच्या दप्तरातील वस्तू तरी पळवे किंवा शाळेतील वस्तूंची मोडतोड तरी करी असे प्रकार दररोज सुरु झाले. अभ्यासाकडे पण त्याचे लक्ष अगदी बेताचेच. पण शाळेकडेच परिक्षा असल्यामुळे तो चौथी इयत्ता कशी तरी पास झाला.

ताडपुळे गावात हायस्कूल नव्हते. त्यामुळे श्रीपती पुढे कसा काय शिकणार हा मोठा प्रश्नच होता. दोनतीन मैल अंतरावरच्या हायस्कूलात घातले तरी वह्या, पुस्तके, कपडे, ह्यांचा खर्च झेपतो की नाही हाही राणूपुढे प्रश्नच होता. त्यासाठी कर्ज काढून सावकारी पाशात गुंतून मुलांच्या डोक्यावर कर्जाचा बोजा ठेवणे पण राणूला पटत नव्हते. पण मुलाला जर शिकवलं नाही तर मग आपल्यासारखा तोही जन्मभर मजुरी करुन अर्धपोटीच रहायचा हेही त्याला योग्य वाटत नव्हतं, म्हणून मग त्याने नाइलाजाने कर्ज काढून मुलाच्या शिक्षणाची सोय केली.

हायस्कूलमध्ये श्रीपतीची अजिबात प्रगति नव्हती. त्याने रडतखडत चार वर्षे पूर्ण केली. शेवटची परीक्षा तरी मुलाने चांगल्या प्रकारे पास व्हावी म्हणून तो श्रीपतीला म्हणाला "शिरपा अरे! आता तरी उनाडक्या बंद कर की! कालच तुझं गुरुजी भेटले व्हते, ते सांगत होत की तुमचा मुलगा अभ्यास करत नाही. व वर्गात पण त्याचं लक्ष नसतं. अरे! तू जर नापास झालास तर तुला कोण नोकरी देणार! अर नोकरी जर का मिळाली नाही तर मग तू तुझं प्वाट कसं भरणार! तुला पण त्यासाठी माझ्याप्रमाणं मोलमजुरीच करावी लागलं की! तवा, मी म्हणतोया की आता तरी शाणा हो, अभ्यास कर म्हंजे नोकरी मिळत मंग आमचं कष्ट पण कमी होतील अन् कर्जचा बोजाही उतरेल.

पण मुलगा हुशार निघून बापाचे पांग फेडण्याचे राणूच्या नशिबी नव्हते. नशीब एवढेच की तो तिसऱ्या प्रयत्नात हायस्कूलची परीक्षा पास झाला. त्यामुळे त्याच्यासाठी नोकरी शोधणे सुरु केले. पण ती सुखासुखी थोडीच मिळते? त्यासाठी बापलेक वणवण भटकले. पण कोठे काही जमण्याचे दिसेना. अहो नोकरी मिळवायची म्हणजे काय सोपी गोष्ट आहे? त्यासाठी चांगली ओळख तरी हवी. राणू सारख्या गरीबाची कुठली ओळख अन् कुठला वशिला. म्हणून त्याला मुलाच्या नोकरीसाठी तिसऱ्या मार्गाचा अवलंब करावा लागला. त्यासाठी नाईलाज म्हणून त्याने सावकाराकडून कर्ज काढले अन् श्रीपतीला एकदाचा नोकरीला चिकटवला.

शिक्षण घेऊनही नोकरीसाठी चिरीमिरी द्यावी लागली व त्यासाठी सुद्धा आपल्या बापाला कर्ज काढावे लागले हे पाहून श्रीपतीही अस्वस्थ झाला. त्याला वाटू लागले की केवळ नोकरी लावून देण्यासाठी जर चांगले लोक पैसे घेतात तर मग आपण लोकांची कामे करुन देत असतांना त्यांच्याकडून पैसे घेण्यास काय हरकत आहे? त्यामुळे आपली गरीबी नाहीशी होईल व कर्ज पण फिटेल. कारण नुसत्या पगारात ते शक्य होणार नाही. म्हणून त्याने नोकरी लागल्यावर काही दिवसातच तेथील रागरंग बघून गिऱ्हाईक भेटेल त्याप्रमाणे प्रथम

अप्रत्यक्ष व नंतर उघडपणे पैसे घेण्यास सुरवात केली. त्यामुळे दोन चार वर्षात श्रीपतीच्या घराचे चित्र हळूहळू बदलू लागले. बापाची फाटकी पैरण जाऊन त्या ठिकाणी नवीन शर्ट आला. आईची ठिगळांची साडी जाऊन त्याऐवजी लांबरुंद साडी आली. इतरही वस्तू घरात येऊ लागल्या. असेच काही दिवस गेल्यावर श्रीपती आईवडिलांना म्हणाला तुम्ही आता बाहेरची कामं करणे सोडून द्या व विश्रांती घ्या, आता आपल्याला काही कमी पडायचं नाही. कारण नोकरीत कशी कमाई करायची हे आता मला चांगल माहित झालंय.

पण राणूला अशी कमाई करणे मुळीच आवडत नव्हते. तो इतके दिवस गप्प राहून ते पहात होता. पण तुम्ही कामं करणं सोडून द्या हे सांगितल्यावर त्याला रहावेना व ताडकन म्हणाला 'अरे! तुझं वागणं मी बघतोय! तू हरामाचा पैसा मिळवून घर भरतोयस पण लेका, हे मला मुळीच पसंत नाही बघ! पुराचे पाणी येतं अन् जसं जातं ना तसा हा पैका कवाच निघून जाईल हे तुला कळायच पण नाही! अपापाचा माल गपापा! अरे एकदा माणूस कामासाठी तुला पैका देतो तेव्हा तो काय सुखासुखी देतो व्हय? अरे! आपल्या बायका मुलांच्या तोंडचा घास काढून तो तुला पैसा तेतो. अन् मग मला सांग त्या बायकामुलांचे शाप आपल्याला लागल्याशिवाय राहतील कां? अन् हे शापच तुला कवातरी खड्ड्यात टाकतील की! अरे! तुला नोकरीला लावताना मी जे काय पैसे दिले ते शिव्याशाप देतच दिले की! अन् दिलेला पैसा जर ऋण काढून दिला असता ना तर मुळीच पचत नाही. परवाच मी एकले मी तुला नोकरी मिळाली म्हणून पैसे दिले त्याच्या घरी चोरी झाली अन् चोरांनी त्याच घर दार साफ केलं. मग मला सांग गरीबाचे शाप लागतात का नाही? तवा, तू माझ सांगणं ऐक. तुला कामाचा महिन्याच्या महिन्याला पगार मिळतो ना, मग ही वरकट मिळकत घेणं एकदम बंद कर. अरे! असला पैसा म्हणजे वीष आहे वीष! ते जहर तुला कवा खाऊन टाकल याचा पत्त्या पण तुला लागायचा नाही."

पण श्रीपतीला बापाचे हे बोलणे कधीच पटले नाही. तो उलट बापाला म्हणे "बाबा! हे तुमचे विचार आता खूप जुने झाले. या नव्या जमान्यात पैसे घेतल्याशिवाय कुणीच कुणाच काम करत नाही. अन् मग सांगा, मी जर जास्तीचे पैसे कमवले नाहीत तर तुमच कर्ज कसं फिटणार? अन् आपली गरिबी कशी काय हटणार? अन् मला सांगा तुम्ही लोकांकडे एवढं इमानदारीने काम करुन काय मिळवलत? तुम्हाला पोटभर खायला तरी मिळालं कां? माझ्या शिक्षणासाठी तरी कुणी तुम्हाला मदत केली कां? शिक्षणाच्या वेळी अन् मला नोकरी मिळण्यासाठी तुम्हालाच कर्ज काढावं लागलं की! हे जेव्हा मी सगळं पाहिले तेव्हाच मी ठरवलं की नुसत्या पगारात काम करत टाचा घासत मरायचं नाही. जमेल तेव्हा जादा कमाई करायची अन् आपली गरीबी हटवायची, अहो! मी आता काही दिवसात ओढ्याकाठचा एक फ्लॉट पण घ्यायच ठरवतोय! मी एकाचं काम करुन देणार आहे आणि म्हणून मला तो कमी किंमतीत मिळणार आरे.

श्रीपतीचे हे बोलणं राणू अगदी कान टवकारून ऐकत होता पण त्याला त्यावर एक अक्षर पण पटत नव्हतं. शेवटी न राहवून तो श्रीपतीला पुन्हा म्हणाला "अरे! हे तुमचं असलं वागणं त्या आभाळातल्या देवाला कधीच सहन व्हायचा नाही. तो समद व्यवहार अगदी डोळे फाडफाडून बघत असतो. अन् एखदा का शंभर

अपराध भरलं की अशी ठोस चपराक देतो की उठायचं कामच नाही बघ! म्हणून तुला मी अगदी शेवटचं निकराचं सांगतो हा बिनकामाचा पैका घेणं बंद कर. तुझ्या हापिसात बरेच लोक असला पापाचा पैका कमावतात म्हणून आपण पण तसच करायचं? सगळी शेण खात्यात म्हणून आपन पण खायचं कां सांग! अरे! माझ शेतावरचं काम अन् तुझ्या आईनं धुणभांडी करण्याचं काम संपल नाही तरी चालेल अरे! आपण जन्मभर गरिबीत राहू. आपल्याला नवीन घर पण नको आपण एक वेळ जेवू पण ताठ मानेने जगू. तू पण तुझ्या झुट्या कमाईतून आम्हाला पोसू नकोस, अन् घर पण बांधू नकोस. झुट्या कमाईतून बांधलेल्या घराचा पाया पक्का नसतो हे ध्यानात ठेव. ते कवा कोसळेल ते सांगता येणार नाही. तू घर बांधल्यावर लोक काय म्हणतील ठावं हाय? ते म्हणतील "शिरप्यनं हे जे घर बांधलय ना ते खालेल्या पैशातून बांधलय! तेव्हा ते फार दिस मुळीच उभ राहयचं नाय! कवातरी ते कोसळलच पाहिजे बघा" तवा शिरप्या हे तुझ फुकटच खाण एकदम बंद करून टाक. हे माझ तुला अगदी शेवटचं सांगणं आहे.

पण वडिलांचा हा सदुपदेश श्रीपतीच्या कानावरुन पलिकडे जात होता. कानात मुळीच शिरत नव्हता. त्यामुळे त्याच्या वागण्यात मुळीच बदल झाला नाही. त्याने वाममार्गाने पैसा जमविण्याचे तंत्र चालूच ठेवले. राणू त्यामुळे दिवसेंदिवस खंगत चालला व एके दिवशी त्याने इहलोकची यात्रा संपविली. राणूच्या मागे त्याची पत्नी पण जास्त दिवस जगली नाही.

बरीच कमाई झाल्यावर श्रीपतीने ओढ्याकाठी घेतलेल्या जागेवर चांगला घर बांधले. त्याचे घर म्हणजे ताडपुळे गावात एक चर्चेचा विषय झाला. काही लोक म्हणत "साधा नोकर सात आठ वर्षात एवढं चांगल घर करू काय बांधू शकतो?" त्याला उत्तर म्हणून म्हणत 'अहो! न व्हायला काय झालय! त्यानं कधी हात ओले केल्याशिवाय कुणाची काम केलीत कां? त्याच्या घराचा सगळा पैसा गरीबांना लुबाडून जमा झालेला आहे. तेव्हा बघाल तुम्ही त्या गरीबांचे शाप त्या घराला लागल्याशिवाय रहातील कां?

अन् घडल पण तसच. गेल्या १०० वर्षात पडला नाही एवढा प्रचंड पाऊस ताडपुळे गावात त्या वर्षी पडला आणि कधी आला नव्हता एवढा पूर त्या गावाकाठच्या ओढ्याला आला. श्रीपतीचे घर तर बघता बघता पाण्याने वेढून गेले. गावकरी चांगले म्हणून त्यांनी श्रीपतची व त्याच्या बायकामुलांची त्या घरातून कशीबशी सुटका केली. घरातील सामान वाचवणे तर कोणालाच शक्य नव्हते. ओढ्याचे पाणी सतत वाहतच होते. अन् त्याच्या तुफान वेगाने येणाऱ्या पाण्याचे दणके श्रीपतीच्या घरावर आदळत होते श्रीपती हताशपणे हे दृष्य पहात होता. त्यावेळी मात्र त्याला वडिलांच्याच शब्दांची आठवण झाली. खरी कमाईच टिकते हरामची कमाई फार काळ टिकत नाही. घामाने मिळविलेल्या पैशातून बांधलेली इमारत खूप टिकते कारण तिला नीतीचा मजबूत पाया असतो" पण आता त्या आठवणींचा काहीच उपयोग नव्हता. वेळ केव्हाच निघून गेली होती. कारण शेवटी एका जबरदस्त लाटेने त्या इमारतीचा घास केव्हाच गिळून टाकला होता. एवढेच नव्हे तर पायाचे दगड पण लाटेने उखडून टाकले होते व ते पण वहावत चालले होत. गावकरी म्हणत होते "पाप पायासकट वाहून गेले."

■ ■ ■

# श्री गजानन महाराज बोधामृत

**सु. ह. जोशी**

***श्री गजानन महाराज (शेगाव) यांच्या लीलांवर संतकवी दासगणू यांनी लिहिलेली 'गजाननविजय' महाराष्ट्रातील एक अत्यंत लोकप्रिय पोथी आहे. महाराष्ट्राच्या घराघरात ज्ञानेश्वरी-तुकाराम गाथेप्रमाणेच 'गजाननविजय' श्रद्धेने वाचला जातो. अशा त्या ग्रंथावर आधारीत गजानन भक्त ल. ह. पाठक यांनी लिहिलेले 'गजानन महाराज बोधामृत' अत्यंत रसाळ संग्राह्य आहे.***

श्री क्षेत्र शेगावनिवासी परमवंदनीय श्री गजानन महाराजांचा महिमा दिवसेंदिवस वृद्धिंगत होत आहे. प्रतिवर्षी पुण्यात येणारी त्यांची पालखी अवश्यतेने पाहावी, अभूतपूर्व गर्दी! अक्षरश: श्री ज्ञानेश्वर - तुकारामांप्रमाणेच श्री गजानन महाराजांनी पुणेकरांना वेड लावलेलं आहे. पुणेकर - नगरकर - नाशिककर, मुंबईकर -ठाणेकर सगळ्या महाराष्ट्रालाच! आता काही लोक या सगळ्यांना नावेही ठेवत असतील पण एकच विचार मनात येतो की स्वातंत्र्य मिळून पन्नास वर्षे झाली पण देशात काही सुख - शांती - समाधान - प्रसन्नत्ता समृद्धी नांदेना! खूप वाट पाहिली पण जीवन आपले रखरखीतत.... अधिकाधिक कठीण होत चाललेले आहे.... अशावेळी संकटसमयी लोक श्री गजाननमहाराजांकडे आशेने पाहाणारच. तिथे त्यांची मने शांत, तृप्त, स्वस्थ होत असतील तर हसण्याचे काय कारण आहे? कुणाच्या मार्गात न येता, कोणाचे वाईट न करता, समाजाचे अहित न करता, एखादा भक्ती करत असेल तर अवश्यमेव त्याला भक्ती करु द्यावी! त्याच्या बुद्धिभेद करु नये. लोकांची अपार श्रद्धा असते.

एक मित्र होता त्याला पाऊण लाखाच्या आसपास ऋण (कर्ज) झालेले होते. बिचारा हबकला होता. पण दुसऱ्या मित्राने धीर दिला. "श्रीगजाननविजय"चा चौदावा अध्याय नियमितपणे वाचत जा.... मित्राने नियमितपणे कर्जफेड नि नियमितपणे अध्यायवाचन श्रद्धेने चालू ठेवले. नि काय आश्चर्य? आज त्याचे ऋण ११० वर आलेले आहे. कोणी काही म्हणा, श्री गजानन महाराजांचा महिमा अपार आहे. ते भक्तिभावाने संतुष्ट होणारे आहेत. भक्त प्रतिपालक आहेत....

श्री गजानन महाराजांवर असंख्य जणांची भक्ती आहे. अनेक त्यांच्या भक्तींनी विविध क्षेत्रांत कामेही केलेली आहेत. श्री गजानन महाराज शेगाव संस्थान येथे सर्व भक्तांना मुक्तद्वार भोजन (विनामूल्य), आयुर्वेद - होमिओपाथी - ॲलोपाथी उपचार, इलेक्ट्रॉनिक्स, अभियांत्रिकी महाविद्यालय, वारकरी, शिक्षणसंस्था आदी अनेक उपक्रम चालतात.

श्री गजानन महाराजांची श्री दासगणू यांनी लिहिलेली पोथी "श्री गजाननविजय" अतिशय रसाळ आहे. त्यांतील निवडक काही श्लोक वा ओव्यांचे मराठी शार्दूलविक्रीडित वृत्तांत नगरचे प्रख्यात

श्रीगजाननमहाराज भक्त श्रीमान ल. ह. पाठक यांनी रुपांतर केलेले आहे. तत्पूर्वी श्री. पाठक यांनी "गण गण गणात बोते" ही श्री गजाननमहाराजांच्या जीवनचरित्रावर अतिशय रसाळ कादंबरी लिहिलेली आहे. वाचकांनी तिचे प्रचंड स्वागत केले. असून अल्पावधीत त्या कादंबरीची आवृत्ती काढावी लागली. आता "श्रीमहाराजांचे बोधामृत" ही छोटी संग्राहक पुस्तिका त्यांनी प्रसिद्ध केली आहे. हे काव्यातून काव्यात रुपांतर वा काव्याचा काव्यात अर्थ सांगणे अतिशय सरस उतरलेले आहे. कवी, कादंबरीकार श्री. पाठक यांनी श्रीगजानन महाराजांच्या मुखातून निघालेली अमृतवाणी निवडलेली आहे. महाराजांचे हे अमृतकण मनाला बोध करतात शांती, प्रसन्नता देतात. श्री दासगणूंच्या रचनेप्रमाणेच हे रुपांतर ही मोठे सुंदर झालेले आहे. नादपूर्ण झालेले आहे.

मूळ ओळी—

**जे जे जयाने सांगावे।**
**ते ते तयाने आचरावे।।**
**शब्दच्छलासी, ना करावे।**
**साधकाने केव्हांही।।**

आता ल. ह. पाठकांची ही रचना—

अरे! जे जयाने, जगी ज्ञान द्यावे।
तसे ते तयाने, स्वये आचरावे।।
शब्दच्छलासी, वृथा ना करावे।
अशी साधकाची, रिंती बा पहावे।।

मूळ ओवी:-

**साह्य झाल्या जगन्नाथ।**
**काय एक ना ते होत?।।**
**ईश्वरी सत्ता अगाध सत्य।**
**जे ना घडे तेच घडवि।।**

पाठक:-

प्रभू-प्रेम जेव्हा, जगी साथ देते।
मनालागि तैसे, घडूनीच येते।।
पहा जाहल्या, राजि तो श्रीगणेश।
हवे ते घडे बा, जगी निश्चयास।।

मूळ ओवी:

**अरे काम करत्या पुरुषप्रत।**
**ऐशी संकटे येतात।।**
**वरच्यावरी जाण सत्य।**
**त्याची चिन्ता वाहू नको।।** (८,५७)

पाठक:

अरे कामकर्त्या, पहा त्या नरासी।
असे तोंड देणे। किती संकटासी।।
परी काळजीसी, तेथे ना करावे।
प्रभूपाठि आहे, सदा त्या पाहावे।

मूळ ओवी:

**आत्महत्या करु नये।**
**हताश कदापी होऊ नये।।**
**प्रयत्न करण्या चुकू नये।**
**साध्य वस्तू साधण्यास।।** (१४,३८)

पाठक:

गड्या आत्महत्या कदा ना करावी।
तशी ती 'निराशा' कदा ना वरावी।।
अखंडीत यत्ने, तुवा आचरावे।
परी साध्य ते, निश्चये प्राप्तवावे।।

मूळ ओवी:

**आता तरी येथून।**
**खर्च करावा सांभाळून।।**
**उगे न करी उधळेपणा।**
**त्यात नसे सार काही।।** (१४, ५७)

पाठक:

प्रपंचात खर्चास, सीमा असावी।
उधळीत वृत्ती, कदा बा नसावी।।
गड्या आय पाहोनि खर्चा करावे।
अनाठायी खर्चास, त्वा ना करावे।।

श्री गजानन भक्तांनी भाविकांनी, जिज्ञासूंनी अवश्य संग्रही ठेवावे, असे हे श्री महाराजांचे बोधामृत आहे.

■ ■ ■

# एकनाथ महाराजांच्या भागवतातील
# विचार मोती

**कृष्णा तेली** (कुडाळ)

***ज्ञानेश्वरी प्रमाणेच महाराष्ट्रातील आणखी एक लोकमान्य ग्रंथ म्हणजे संत एकनाथ महाराजांचे 'भागवत'. भागवत हा श्रीकृष्ण लीलांच्या गुणवर्णनपर ग्रंथ असून भक्ती हेच त्याचे अधिष्ठान आहे. श्री साईबाबा भक्तांना भागवत वाचण्याचा उपदेश करीत. अशा त्या नाथभागवतातील 'विचारमोती'—***

संत-एकनाथ महाराजांनी आपल्या भागवतात भक्तीचा महिमा गायलेला आहे तो सद्भक्तांना दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरणारा असाच आहे. यामुळेच श्री साईबाबा आपल्या भक्तांना भागवत वाचण्यास देत असत. त्यामुळे साहजिकच ते आपल्या प्रिय भक्ताला भक्तिमार्गाची वाट सुखकर करुन देत असत. साधना, नामाची महती, सद्भक्त कसा असावा, सद्गुरु कसा ओळखावा, संसारी जनानी भगवंताचे कसे होऊन रहावे, साधक कसा असावा आपले आहार, विचार, मन, शरीर, आत्मा याबद्दल अत्यंत उपयुक्त मार्मिक व सोदाहरण अशी माहिती यात मुमुक्षुस मिळते. मी कोण? यांचे ही उत्तम विवेचन या ग्रंथ-सारात वाचावयास मिळते. तसेच संत व महापुरुषांची लक्षणे विस्ताराने विशद केली आहेत.

या साररुपातून निवडलेले काही विचार :-

- ❑ हरिकथेविषयी ज्यांच्या मनात आदरभाव असतो ते खरे पुण्यवान समजावेत. असे एकनाथ महाराज म्हणतात.
- ❑ भगवंताचे अखंड नाम घेत गेल्यास त्या भक्ताला सर्व संसारच भगवंतमय दिसू लागतो. त्यामुळे तो मीपणाचा नाश करुन देहाची कर्मे करित असतो.
- ❑ दिनांचा उद्धार हेच संताचे ब्रीद असते
- ❑ अंतकाळी जी 'मती' असते तीच 'गती' प्राण्याला प्राप्त होते. म्हणून सावधानता ठेऊन भगवंताचे चिंतन करावे.
- ❑ देह म्हणजेच आत्मा अशी ज्यांनी भावना ठेवली त्यांना सुख कोठून मिळणार? सर्वात वाईट 'देहबुद्धी'. या देहबुद्धिमुळे जीवाला चिंता कधीच सोडीत नाही.
- ❑ ज्याचे अखंड 'श्रीकृष्णभजन' चालते त्याला 'भावबंधन' नसते.
- ❑ 'सद्भाव' हा सर्व साधनांमध्ये 'श्रेष्ठ' आहे.
- ❑ विरक्ती व भक्ती एकाच ठिकाणी वास करतात.
- ❑ देहाभिमान हा संसाराचा मुख्य कर्ता आहे.
- ❑ विषयांच्या लोभामुळे चित्ताचे समाधान नाहीसे होते.
- ❑ सर्व विषयापासून मनाने खरोखरीच निवृत्त व्हावे अशी जर इच्छा असेल तर अगोदर सत्संग करावा.

- भगवंताच्या सतत नामस्मरणाने अन्त:करण पवित्र बनते.
- साधकाने सुख-दु:ख, लाभ-हानी, शीत-उष्ण इत्यादी द्वंद्वे सहन करणे या गुणाला 'तितिक्षा' असे म्हणतात.

### ।।'विवेक' हा माहूत ।।

- विषयरुपी मदोन्म हत्तीला वठणीवर आणणारा माहूत "विवेक" हाच होय.
- नामस्मरणाने वाचा पवित्र बनते व तीमध्ये स्वाभाविक सत्य असेल ते प्रकट होते.
- सत्याहून निराळे तप नाही, सत्याहून निराळा जप नाही व त्यानेच परमेश्वराची प्राप्ति होते.
- एकाची स्तुती आणि दुसऱ्याची निंदा केल्याचा मोठा दोष लागतो. आपल्या मातेला तो नमस्कार व इतर स्त्रीया परक्या म्हणून त्याना काय लाथा माराव्यात?
- भक्तिपाशीच नित्य तृप्ती, मुक्ती व भगवत्प्राप्ती असते यात काहीच संशय नाही.
- भजन करित असताना देहभान विसरुन त्यात 'तन्मय' होणे हीच भजनाची सिद्धी आहे.
- भगवंतावर ज्याची पूर्ण निष्ठा असते तो स्वत:वर आलेली संकटे ही परमार्थाच्या प्रगतीस उपकारच आहेत असे समजतो.
- अभिमानासारखे खोटे व वाईट त्रिभुवनात दुसरे काही नाही.
- श्रीहरी सर्वांच्या ह्रदयात वास करीत असतो त्यामुळे जे दुसऱ्यांचा द्वेष करतात ते परमेश्वराचाच द्वेष करतात. जो दुसऱ्याचा घात करतो तो स्वत:चाच घात करतो.
- निरंतर 'नामस्मरण' हेच कलियुगातील परमार्थाचे 'सार' होय.
- जी जी वस्तू आकाराला आली आहे ती ती वस्तू नाशिवंत व मायिक आहे असे समजावे.
- ज्याप्रमाणे शेतात चांगले बीज-पेरले असता उत्तम पीक येते, त्याप्रमाणे सत्वांनी केलेले दान अनंत फल देते.
- काया वाचा आणि मन यानी जे नित्यकर्म होते ते सारे **विहित कर्म** होय, विधिनिषेधाला सोडून जे केले जाते ते **विकर्म** होय, आणि कर्मच न करणे म्हणजे **अकर्म** होय.
- संसारसागर तरुन जाण्यास मुख्य 'सद्बुद्धी' पाहिजे.
- ऊस आपल्या अंगभूत गोडीने सर्वांना सुख देतो तसे योगी पुरुष संसारात राहून आपल्या गोड वर्तनाने परोपकार करतात.

### ।।सुख दु:ख प्रारब्धाधीन।।

- आपल्या जीवनात अनुभवास येणारे सुख-दु:ख हे प्रारब्धाधीन आहे हे लक्षात ठेवून नित्य संतोषाने राहावे.
- इच्छा न करताच दैव मनुष्याला सुख अथवा दु:ख भोगावयाला लावते.
- जोपर्यंत भगवंतावर आपले प्रेम जडत नाही तोपर्यंत निश्चित सुख लाभत नाही.
- जसजसे संसारापासून तुम्ही आपले मन निवृत्त कराल तसतसे आत्मसुख तुम्हाला प्राप्त होईल.
- अभिमान हा सर्व दु:खाचे, चिंता व व्यापाचे मूळ आहे. यासाठी त्याचा प्रभाव त्याग करायला शिकले पाहिजे.
- हातामध्ये दोन दोन कंकणे असली तर ती आवाज करतात. एकएक कंकण उरल्यास मात्र आवाज होत नाही. तात्पर्य एकतेसारखे सुख नाही.
- ज्याला एकाग्रता साधता आली तो भाग्यवान समजावा.
- शरिराला उत्पत्ती, बुद्धी, परिणाम, क्षय हे विकार जडलेले असतात. त्यामुळे जन्म, मरण, क्षुधा, तृष्णा, शोक आणि मोह या सहा उर्मी निर्माण होतात. त्यामुळेच जीवाला सुख दु:ख भोगावे लागते.
- देहाच्या सुखोपभोगाची जेवढी साधने आहेत. ती सारी बंधनात टाकणारी आहेत. त्यामुळे वासना वाढत जाते